उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळाच्या अधिपत्याखालील ९ ट्रामा केअर सेंटर येथील १३५ अस्थाई पदांना मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः अपदे-२०१७/प्र.क्र.६२/आरोग्य-४
१० वा मजला, कॉम्पलेक्स बिल्डींग,
जी.टी.हॉस्पिटल आवार, मुंबई.
तारीख: १ नोव्हेंबर, २०१७.

वाचा

1. **शासन निर्णय, सा.आ.वि., क्रमांकः अपदे-२०१७/प्र.क्र.६२/आरोग्य-४, दि.१९.०४.२०१७.**
2. **सहसंचालक, आरोग्य सेवा, रूग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र, क्र.संआसे/कक्ष-३/टे-५/९ ट्रामा केअर सेंटर/अपदे-१३५/सन२०१७-१८/३८२०-२१/१७, दि.१३.०४.२०१७.**
3. **शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकः पदनि-२०१६/प्र.क्र.८/आ.पु.क., दि.०३.१०.२०१७.**

शासन निर्णय

उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळाच्या अधिनस्त ९ ट्रामा केअर सेंटर येथील १३५ अस्थाई पदांना संदर्भाधीन क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये दि.१.०३.२०१७ ते दि.३०.०९.२०१७ या कालावधीपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळाच्या अधिनस्त ९ ट्रामा केअर सेंटर येथील १३५ अस्थाई पदांना दि.१.१०.२०१७ ते दि.३१.१२.२०१७ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

सदर पदांवरील खर्च सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या मागणी क्रमांक आर -१ मुख्य लेखाशिर्ष "२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६-सार्वजनिक आरोग्य, ८००-इतर खर्च, पंचवार्षिक योजनातंर्गत योजना-राज्य योजनातंर्गत योजना, (०१)(४५)- ट्रामा केअर युनिटची स्थापना, महाराष्ट्र आपत्कालीन सेवा प्रकल्प (२२१० जी २९८) (अनिवार्य खर्च)" या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभाग, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/आ.पु.क., दि.०३.१०.२०१७ अन्वये प्रशासकीय विभागप्रमुखांना प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२७१७४४२६३११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=685cbbb5899027ea29d44ae02d12f2c1313143ad8376755d0e815a1eb20fd0ce, cn=Roshani Dinesh Kadam Patil
Date: 2017.11.01 16:58:30 +05'30'

(रो.दि.कदम-पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, १/२,महाराष्ट्र (लेखा व लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (रूग्णालये-राज्यस्तर), मुंबई.
५. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), पुणे.
६. सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (लेखा व लेखापरिक्षा), पुणे.
७. उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळ, औरंगाबाद.
८. जिल्हा शल्य चिकित्सक, परभणी/ औरंगाबाद/जालना/हिंगोली
९. जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी/औरंगाबाद/जालना/हिंगोली.
१०. जिल्हा आरोग्य अधिकारी, परभणी/औरंगाबाद/जालना/हिंगोली
११. वित्त विभाग (व्यय-१३, अर्थसंकल्प-१९), मंत्रालय, मुंबई.
१२. अवर सचिव (सेवा-२/ सेवा-३/ सेवा-५ /अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१३. निवडनस्ती (आरोग्य- ४).